## उल्हासनगर महानगरपालिका,उल्हासनगर

जा.क्र. उमपा/वै.आ.वि/७५५/२०२०
दिनांक : १ जुलै, २०२०

**अत्यंत महत्त्वाचे/तातडीचे**

**विषय :- कोरोना विषाणूमुळे उदभवलेल्या संसर्गजन्य रोगाचा प्रतिबंध व नियंत्रण आणणेसाठी उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रामध्ये लॉकडाऊन करणे**

**संदर्भ-**
1. **भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम, १८९७**
2. **आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५**
3. **महाराष्ट्र शासन, अधिसुचना, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक करोना २०२०/प्र.क्र.५८/आरोग्य ५, दिनांक १४ मार्च २०२०**
4. **GOI, Ministry of Home Affairs, Dated ३०th May २०२०**
5. **महाराष्ट्र शासन, महसूल व वने, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुर्नवसन विभाग, यांचेकडील आदेश क्र. DMU/२०२०/C.R.९२/DMU-१, Dated ३१st May २०२०, ४th June २०२०, २९th June, २०२०**
6. **इकडील आदेश क्र. उमपा/वै.आ.अ/२२१/२०, दिनांक ०२ जुन, २०२०**

# आदेश

१. ज्याअर्थी, संपूर्ण जगात कोरोना साथरोगाने चिंतेचे वातावरण निर्माण केले असून, कोविड-१९ या रोगाचा प्रसार टाळण्यासाठी शासनाने अनेक प्रतिबंधात्मक उपाययोजना लागु केल्या आहेत. त्यादृष्टीने राज्य शासनाने रोगाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंध कायदा, १८७९, दिनांक १३ मार्च, २०२० पासून लागु करण्याबाबत अधिसुचना निर्गमित केली आहे. आणि,

२. ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या खंड २ (१) नुसार महाराष्ट्र कोविड-१९ उपाययोजना नियम २०२० संदर्भ क्र. ३ अन्वये महानगरपालिका आयुक्त हे सक्षम प्राधिकारी घोषित करुन त्यांना कोविड-१९ वर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपाययोजना करणे आवश्यक आहेत, त्या करण्यासाठी ते सक्षम असतील असे घोषित करण्यात आले आहे, आणि उक्त नियमाखालील नियम १० अन्वये आवश्यक त्या उपाययोजना करण्याचे अधिकार आयुक्तांना विहीत करण्यात आले आहेत, आणि त्यानुसार उक्त संदर्भान्वये शासनाने व महानगरपालिकेने विविध आदेश निर्गमित केलेले आहेत. आणि,

३. ज्याअर्थी, परंतु महाराष्ट्र राज्य तसेच मुंबई व इतर शहरांमध्ये कोरोना बाधितांच्या संसर्गाची वाढती संख्या विचारात घेता, उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये मुंबई तसेच अन्य झोनमध्ये येणाऱ्या शहरांमध्ये कोरोनाचा संसर्ग रोखण्यासाठी दृष्टीने प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणुन सदर ठिकाणी लॉकडाऊनचा कालावधी हा दिनांक ३० जुन, २०२० पर्यंत वाढविण्यात आला होता. आणि,

४. त्याअर्थी, दिनांक ०२ जुन, २०२० रोजीच्या आदेशान्वये नागरिकांची गैरसोय होऊ नये याकरिता मोठया प्रमाणात Mission Being Again या धोरणान्वये बऱ्याच बाबींमध्ये सुट देण्यात आलेली आहे. सर्व सहाय्यक आयुक्त, प्रभाग समिती यांना P१ व P२ तत्वावर सम व विषम तारखेला दुकाने चालु करण्याचे आदेश काढुन अंमलबजावणी करण्यात आली. मात्र नागरिकांची मोठया प्रमाणावर रस्त्यावर, दुकानांवर गर्दी दिसुन आली. सामाजिक अंतराचे (Social Distancing) पालन होत नसल्याचे आढळुन आले. दिनांक ०१ जुन, २०२० ते दिनांक ३० जुन, २०२० पर्यंत कोरोना बाधित रुग्ण संख्या १३६६ आहे. सद्या कंटेंमेंट झोन संख्या १४२ वर गेलेली आहे.

५.  त्याअर्थी, मी डॉ. राजा दयानिधी, आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका कोरोना विषाणूचा संसर्ग व प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा भाग म्हणुन मला परिच्छेद क्र. १ मध्ये नमुद केलेल्या अधिसुचनेन्वये प्राप्त झालेल्या अधिकारानुसार, दिनांक ०२ जुन, २०२० रोजीच्या आदेशात बदल करुन, "**संपुर्ण उल्हासनगर महानगरपालिका कार्यक्षेत्रात दिनांक ०२ जुलै, २०२० रोजी सायंकाळी ०५.०० वाजलेपासुन ते दिनांक १२ जुलै, २०२० रोजी सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत संपुर्ण बंद (लॉकडाऊन) घोषित करीत आहे.**"

६.  उक्त लॉकडाऊनच्या कालावधीत गैरसोय होऊ नये म्हणुन **तक्ता "अ"** मध्ये सुट देण्यात येत आहे.

**तक्ता "अ"**

| अ. क्र | तपशिल | कालावधी |
|---|---|---|
| १ | अन्नधान्य, भाजीपाला, अंडी, फळे, बेकरी, दुध, मासळी, चिकण मटन व इतर जीवनाश्यक वस्तुंची घरपोच सेवा (फक्त Home Delivery ) | उपरोक्त काळात दररोज सकाळी ०९.०० ते रात्री ०९.०० वाजेपर्यंत सुरु राहतील. |
| २ | दुध, डेअरी आस्थापना | सकाळी ०५.०० ते सकाळी १०.०० वाजेपर्यंत सुरु राहतील. |
| ३ | औषधाची दुकाने<br>(फक्त औषधे विकण्याची मुभा असेल) | a) दररोज औषधाची दुकाने सकाळी ०९.०० ते रात्री ०९.०० वाजेपर्यंत भौतिक अंतराचे (Physical Distancing) पालन करुन सुरु राहतील.<br>b) रुग्णालयातील (ज्या ठिकाणी आंतररुग्ण विभाग सुरु आहे अशा ठिकाणी) औषधाची दुकाने २४ तास किंवा त्यांच्या सोयीनुसार सुरु ठेवण्याची मुभा असेल.<br>c) २४ तास सुरु ठेवण्याची परवानगी असणाऱ्या औषधी दुकानांना २४ तास सुरु ठेवण्याची मुभा असेल. |
| ४ | पिठाची गिरणी | दररोज सकाळी ०९.०० ते सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत सुरु राहतील. |
| ५ | मद्य विक्रीची दुकाने<br>(फक्त Home Delivery ) | दररोज सकाळी ०९.०० ते सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत सुरु राहतील. |
| ६ | रेस्टॉरंट व किचन<br>(फक्त Home Delivery ) | दररोज सकाळी १०.०० ते रात्री १०.०० वाजेपर्यंत सुरु राहतील. |
| ७ | सर्व अनावश्यक **(Non Essential )** आस्थापना | दिनांक ०२ जुलै, २०२० रोजी सायंकाळी ०५.०० वाजलेपासुन ते दिनांक १२ जुलै, २०२० रोजी सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत संपुर्णत: बंद राहतील. |

७.  वर नमुद केलेप्रमाणे Home Delivery करताना Home Delivery करणारे व्यक्तींचे स्वंय घोषणापत्र / प्राधिकृत पत्र / ओळखपत्र संबंधित दुकानदार यांनी करावे. त्याचप्रमाणे अशासकीय सामाजिक संस्था (NGO) / स्वंयसेवक (Volunters) यांची मदत घेत असेल तर, त्यांचे स्वंय घोषणा पत्र बाळगावे. सदर ओळखपत्र / प्राधिकृत पत्र / स्वंय घोषणापत्र खोटे आढळल्यास अथवा त्याचा गैरवापर केल्यास त्यांच्या विरुध्द कठोर कायदेशिर कारवाई करण्यात येईल.

८. उपरोक्त संदर्भ क्र. ०५ व ०६ मधील तरतुदीनुसार कोविड-१९ संदर्भात राष्ट्रीय निर्देश तंतोतंत खालीलप्रमाणे लागु राहील.

१) सार्वजनिक ठिकाणी, कामाच्या ठिकाणी तसेच प्रवासाच्या दरम्यान मास्कचा वापर अनिवार्य. मास्क न लावणारे व्यक्तीविरुध्द रक्कम रु. १,०००/- दंड लावण्यात येत आहे.
२) सार्वजनिक ठिकाणी नागरिकांनी एकमेकांमध्ये किमान ६ फुट अंतर ठेवण्यात यावे.
३) लग्नविषयक कार्यक्रम ५० व्यक्तींच्या संख्येच्या मर्यादेत आयोजित करण्यास मुभा असेल,अत्यंविधीला ५० पेक्षा जास्त व्यक्ती उपस्थित राहणार नाही.
४) सार्वजनिक ठिकाणी थुंकणे, धुम्रपान व मद्य इत्यादीबाबत प्रतिबंधात्मक आदेश कायम राहतील.
५) शक्यतो Work From Home कार्यपध्दतीचा अवलंब करण्यात यावा.
६) सार्वजनिक ठिकाणी आत येणे व बाहेर जाणे या ठिकाणी हॅण्ड सॅनिटायझर व थर्मल स्कॅनिंगचा वापर करावा.
७) कामाच्या ठिकाणी, सार्वजनिक सुविधेच्या ठिकाणी जेथे मानवी संपर्क होतो. उदा. दरवाजाचे हॅण्ड इत्यादी ठिकाणी सॅनिटायझेशन करण्यात यावे.
८) कामाच्या ठिकाणी कर्मचाऱ्यांनी भौतिक अंतराचे (PhysicalDistancing) ठेवावे.
९) सार्वजनिक स्वरुपाचे कन्स्ट्रक्शन साईट ज्या यापुर्वी अनुज्ञेय करण्यात आल्या आहेत व सुरु आहेत त्या तशाच सुरु राहतील. पावसाळयापुर्वीची कामे जी यापुर्वी अनुज्ञेय करण्यात आलेली आहेत (खाजगी व सार्वजनिक) ती तशीच सुरु राहतील.
१०) Online Distance Learning आणि अनुषंगिक Activities या पुर्वीप्रमाणेच सुरु राहतील.
११) खाजगी कार्यालये उदा. कॉलसेंटर त्यांच्या एकुण कर्मचारी संख्येच्या १० टक्के क्षमतेने किंवा १० कर्मचारी यापैंकी जे जास्त असतील तेवढयाच संख्येने कार्यरत राहतील.
१२) नागरिकांचे संचालन फक्त अत्यावश्यक सेवेसाठी खालीलप्रमाणे सुरु राहील.

| **वाहनाचा प्रकार** | **अनुज्ञेय प्रवासी संख्या** |
|---|---|
| टॅक्सी/कॅब/aggregator | १ + २ (फक्त अत्यावश्यक सेवा) |
| रिक्षा | १ + २ (फक्त अत्यावश्यक सेवा) |
| चारचाकी वाहन | १ + २ (फक्त अत्यावश्यक सेवा) |
| दुचाकी वाहन | फक्त अत्यावश्यक सेवेकरीता एक चालक |

९. सदर बंद कालावधीमध्ये अत्यावश्यक सेवेतील काम करणारे शासकीय व निमशासकीय, महानगरपालिका, पोलीस कर्मचारी, रुग्णालयातील कर्मचारी व त्यांची वाहने रुग्णवाहीका, सरकारी रास्त भाव धान्य दुकाने (Ration Shop) जीवनाश्यक वस्तुंची ने-आण करणे (होलसेल व किरकोळ विक्रेते व जीवनावश्यक साहित्य किंवा अत्यावश्यक सेवा वाहतूक करणारे वाहन), महानगरपालिकेच्या क्षेत्रातील पेट्रोल, डिझेल, एलपीजी पंप, रुग्णालये, क्लिनिक, लॅबोरेटरी, डायग्नोस्टीक सेंटर, बँक, एटीएम इ. यांना सदर "बंद" मधुन वगळण्यात येत आहे. तसेच दरवर्षीप्रमाणे पावसाळयापुर्वी करावयाची अत्यावश्यक कामे उदा. रस्ते दुरुस्ती, अत्यावश्यक विकास कामे, पाणीपुरवठा इ. साठी लागणारे मनुष्यबळ, यंत्रसामुग्री यांना सुध्दा "बंद" मधुन वगळण्यात येत आहे.

१०. संबंधित संस्था, संघटना व आस्थापनांच्या संदर्भात मा.पोलिस आयुक्त यांचे अधिनस्त अधिकारी, महानगरपालिकेचे अधिकारी आणि इतर सक्षम प्राधिकारी उपरोक्त नियम व अंमलबजावणीसाठी अधिकृत, माणुसकीच्या व न्याय मार्गाने सर्व आवश्यक उपाययोजना करतील.

११. सदर आदेशाचे उल्लंघन करणारी व्यावसायिक आस्थापना आणि दुकानदार मालक, व्यक्ती यांच्यावर उपरोक्त अधिसुचनेनुसार महाराष्ट्र कोविड -१९ उपाययोजना नियम २०२० चे नियम ११ नुसार, भारतीय दंडसंहिता (४५ of १८६०) कलम १८८ मधील तरतुदीनुसार दंडनीय/कायदेशिर कारवाई करण्यात येईल.

१२. सर्व नागरिकांनी "**जाहिर आवाहन**" करण्यात येते की, उपरोक्त काळात नागरिकांनी "**जनता कर्फ्यु**" पाळुन महानगरपालिकेस सहकार्य करावे. हि विनंती.

सदर आदेश तात्काळ अंमलात येतील.

11/7/2020

**(डॉ. राजा दयानिधी, भा.प्र.से.)**
आयुक्त
उल्हासनगर महानगरपालिका

**प्रत-**

१. मा. मुख्यमंत्री महोदयांचे प्रधान सचिव,
२. मा. पालकमंत्री तथा मंत्री नगरविका विभाग महोदयांचे खाजगी सचिव,
३. मा. मुख्य सचिव महोदयांचे विशेष कार्य अधिकारी,
४. मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग,
५. मा. जिल्हाधिकारी, ठाणे,
६. मा. पोलीस आयुक्त, ठाणे,
७. मा. महापौर, मा. उप महापौर, मा. सभापती, स्थायी समिती, मा. सभागृह नेता, मा. विरोधी पक्षनेता, सर्व गटनेता कार्यालय यांचेकडे माहितीसाठी.
८. स्विय सहाय्यक, मा. आयुक्त व अतिरिक्त आयुक्त यांचे कार्यालयाकडे माहितीसाठी.
९. उप आयुक्त(मुख्यालय), सर्व उप आयुक्त यांजकडे माहितीसाठी.
१०. सर्व सहाय्यक आयुक्त/सर्व विभागप्रमुख, समन्वय अधिकारी-नागरी सुविधा केंद्र,
११. मुख्यालय व सर्व प्रभाग समिती कार्यालये, सिस्टीम मॅनेजर, संगणक विभाग यांजकडे महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्दीसाठी.